D:\Pigulkar\Opening New College\List Opening 2012-13\Opening 2012-13\Priya (Marathi letter)

# मुंबई विद्यापीठ

क. संलग्नता २/आय.सी.डी./२०१६-१७/८६०
मुंबई- ४०० ०३२,
दिनांक- २६ जूलै, २०१६.

प्रति,

प्राचार्य,
सर्व अशासकिय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित व स्वयंअर्थसहाय्यीत विधी अभ्यासक्रम संचालक, विद्यापीठाचे नॅशनल स्कूल ऑफ लॉ आणि ठाणे कॅम्पस

विषय : महाविद्यालयाची माहिती सादर करणे बाबत

संदर्भ : शासन पत्र क्र.मवि–२/विधीसामाईक प्रवेश/२०१६–१७/८८२७ दिनांक २५/०७/२०१६

महोदय,

वरील संदर्भातील पत्रानुसार शैक्षणिक वर्ष २०१६–१७ च्या सीईटीद्वारे घेण्यात येणाऱ्या केंद्रिय प्रवेश प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या सर्व महाविद्यालयांनी पुढील प्रमाणे पूर्तता करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

१. शैक्षणिक वर्ष २०१६–१७ साठी ३ वर्षीय व ५ वर्षीय विधी अभ्यासक्रमासाठी बार कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता घेणे आवश्यक आहे. ज्या महाविद्यालयांनी अशा प्रकारची मान्यता घेतली नसेल त्यांनी दिनांक २६ व २७ जुलै, २०१६ रोजी सदर मान्यतेसाठीचे अर्ज बार कौन्सिल ऑफ इंडिया कडे सादर करावे.

२. शैक्षणिक वर्ष २०१६–१७ साठी मुंबई विद्यापीठाशी संलग्नता पत्र असणे आवश्यक आहे. (सदर विद्यापीठ अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाची मान्यता प्रत बार कौन्सिल ऑफ इंडिया कडे अर्ज करताना जोडणे आवश्यक आहे.) ज्या महाविद्यालयांना विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाची मान्यता पत्र मिळाले नसेल त्यांनी विद्यापीठाच्या संलग्नता विभागाचे उपकुलसचिव यांच्याशी संपर्क साधावा. सदर पत्र संलग्निकरण मान्यता पत्र मिळण्यासाठी आवश्यक तो अर्ज करणे व संलग्निकरण फी भरणे आवश्यक आहे.

३. सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१६–१७ साठी बार कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता घेण्यासाठी केलेल्या अर्जाची प्रत व विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांच्या संलग्निकरणाची प्रत पुढील ई–मेल पत्त्यावर दिनांक २७ जुलै, २०१६ रोजी दुपारी ३.०० वाजे पर्यंत पाठवावी.

   i. dlebci@gmail.com
   ii. ashokpandey.bci@gmail.com
   iii. bcud@fort.mu.ac.in

वरील प्रमाणे सदर पूर्तता न केल्यास सीईटी द्वारे घेण्यात येणाऱ्या केंद्रिय प्रवेश प्रक्रियेपासून वंचित राहावे लागेल व आपल्या महाविद्यालयाचे नाव केंद्रिय प्रवेश प्रक्रिये मधून वगळले जाण्याची शक्यता आहे यांची नोंद घ्यावी.

(डॉ. अनिल पाटील)
संचालक,
बी.सी.यु.डी.